**धुळे येथील मे. सिव्हील जज्ज सि.डी. यांचे कोर्टात.**

रे. मु. नं. ५३/२०१४

किशोर रंगराव वगैरे ... वादी

विाा

ग्रामपंचायत वालखेडा, वगैरे ... प्रतिवादी

**प्रतिवादी नं. २ व ३ तर्फे कैफियत व तुर्तातूर्त मनाई हुकूमाचे अर्जाचा खुलासा**

प्रतिवादी मे. कोर्टास नम्रपणे कळवितात ते येणेप्रमाणे

(१) वादीने केलेला दावा तसेच तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा अर्ज व त्यतील वादींचे संपूर्ण कथन तसेच म्हणणे व मागणे हे खोटे, बनावट व लबाडीचे असून ते हया प्रतिवादींना मान्य नाही.

(२) वादीचे दावा व मनाई हुकूमाचे अर्जातील कलम १ व २ मधील मालकी बद्दलचे कथनाबद्दल काहीही म्हणणे नाही मात्र वादीने सदर दाव्यात व तुर्तातूर्त मनाई हुकूमाचे अर्जातील चतु:सिमे मध्ये वहिवाटी रस्ता बद्दलचे केलेले कथन मात्र हया प्रतिवादींना मान्य नाही. त्यासंबंधीचे वादीचे कथन खोटे, बनावट व लबाडीचे असून ते हया प्रतिवादींना मान्य नाही.

(३) वादीचे दावा व तुर्तातूर्त मनाई हुकूमाचे अर्जातील पॅरा कलम ३ मधील बरेचसे कथन अयोग्य दिसते. व काही अंशी बरोबर दिसते. त्यामुळे काही अंशी सदरचे कथन मान्य नाही.

(४) वादीचे दावा व तुर्तातूत्र मनाई हुकूमाचे अर्जातील पॅरा कलम चार मधील कथनाबाबत व त्यातील नमूद केलेल्या गट नंबराबद्दल हया प्रतिवादीचे काहीही म्हणणे नाही, हया प्रतिवादींचा त्याचेशी संबंध सुध्दा नाही.